प्रेस नोट                                                                 दि. ०१/०१/२०२६

| | | |
|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लातुर. |
| २. | पोलीस स्टेशन | निलंगा, जि.लातुर., जि. लातुर |
| ३. | गुन्हयाचे कलम | कलम ७, भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये |
| ४. | तक्रारदार | पुरूष, वय ३८ वर्षे, रा. सोनखेड, पो.सावरी, ता. निलंगा, जि. लातूर |
| ५. | फिर्यादी :— सरकारतर्फे | संतोष धनसिंग बर्गे, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि., लातूर |
| ६. | आरोपी लोकसेवक | कमलाकर विठ्ठलराव मुंडे वय ५२ वर्षे पद— ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) गट क सज्जा — गुंजरगा ता. निलंगा जि. लातूर |
| ७. | गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाण | दि.०१/०१/२०२६ रोजी १३:०५ वा. खाजगी तलाठी कार्यालय दत्त नगर, निलंगा जि. लातूर येथे. |
| ९. | मागणी केलेली लाचेची रक्कम | २५००/— रू. |
| १०. | स्विकारलेली लाचेची रक्कम | २५००/— रू. |
| ११. | थोडक्यात हकिकत :— यातील तक्रारदार यांनी दि. ०१/०१/२०२६ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,लातूर येथे लेखी तक्रार दिली कि, त्यांची आई विमलबाई मोहन सोळुंके यांना श्रावणबाळ सेवा राज्यं निवृत्तीवेतन योजना, इंदिरा गांधी वृध्दापकाळ निवृत्तीवेतन योजना व इतर शासकीय योजनेसाठी उत्पन्नाचा दाखला आवश्यक असून तो मिळवण्यासाठी तक्रारदार हे आरोपी लोकसेवक कमलाकर विठ्ठलराव मुंडे वय ५२ वर्षे, पद ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), गट क तलाठी सज्जा— गुंजरगा, ता. निलंगा जि. लातूर यांना भेटले असता त्यांनी सदर उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी तक्रारदार यांना ५०००/—रू. ची लाच मागणी केली आहे.<br>दिनांक ०१/०१/२०२६ रोजी खाजगी तलाठी कार्यालय, दत्त नगर निलंगा ता. निलंगा जि लातूर येथे तक्रारदार यांचे करवी लाच मागणी पडताळणी केली असता लोकसेवक कमलाकर विठ्ठलराव मुंडे यांनी तक्रारदार यांना त्यांचे आईचे उत्पन्नाचा दाखला देण्यासाठी २,५०० रुपये लाचेची मागणी करून स्वत: स्विकारण्याचे मान्य केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे. दि. ०१/०१/२०२६ रोजी १३.०५ वाजता सापळा कार्यवाही आजमावली असता लोकसेवक कमलाकर मुंडे यांनी तक्रारदार यांच्या कडून मागणी केलेली २,५००/— रू लाच रक्कम त्याचे खाजगी तलाठी कार्यालय,निलंगा येथे पंचासमक्ष स्वत: स्वीकारली आहे.<br>यावरून आरोपी लोकसेवक कमलाकर विठ्ठलराव मुंडे वय ५२ वर्षे पद— ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) सज्जा — गुंजरगा ता. निलंगा जि. लातूर यांचेविरूध्द पोलीस स्टेशन, निलंगा, जि.लातूर येथे गुरनं ०२/२०२६, कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८.अन्वये गुन्हा नोंद झाला आहे.<br>सदर गुन्हयाचा तपास विशाल बहात्तरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. लातूर हे करीत आहेत. | |

सदर सापळा कार्यवाही मा. श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री. अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक संतोष बर्गे, पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे, पोह/भागवत कठारे, भिमराव आलुरे, शाम गिरी, पोकॉ/मंगेश कोंडरे, पोकॉ/दिपक कलवले, पोकॉ/गजानन जाधव, पोकॉ/शिवराज गायकवाड, मपोकॉ/शाहाजान पठाण, चापोना/संतोष क्षिरसागर यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक | :— | ०२४६२—२५५८११ मोबाईल क्रमांक —९२२६४८४६९९ |
| २) | श्री. अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक | :— | ०२४६२—२५५८११ |
| ३) | श्री. संतोष बर्गे, पोलीस उप अधीक्षक | :— | मोबाईल क्रमांक —९२२६२०१०६४ |
| ४) | टोल फ्री | :— | १०६४ |
| ५) | ला.प्र.वि.,लातुर कार्यालय फोन क्रमांक | :— | ०२३८२—२४२६७४ |
| ६) | Website | :— | www.acbmaharashtra.gov.in |
| ७) | Mobile App | :— | www.acbmaharashtra.net |
| ८) | Facebook Page | :— | www.facebook.com/maharashtraACB |
| ९) | 8 Twitter | :— | ACBlatur |
| १०) | Instagram | :— | Acblatur |
| ११) | YouTube Channel | :— | anticorruptionbureaulatur1584 |

(संतोष ध.बर्गे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर